असा. क्र. ४६ रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र


**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**शनिवार, ऑगस्ट १९, २००६/श्रावण २८, शके १९२८**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**


## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम**

**अनुक्रमणिका**


पृष्ठे

**सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५.—** मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५, यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम. . . ३३५-३३८


दिनांक १८ ऑगस्ट २००६ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र राज्य विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**अ. मा. शिंदेकर,**
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

## सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर " **महाराष्ट्र शासन राजपत्रात** " दिनांक १९ ऑगस्ट २००६ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.**

१८८८ चा मुंबई ३. १९४९ चा मुंबई ५९.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९, नागपूर शहर महानगरपालिका



[**किंमत** : रुपये ९.००]

अधिनियम, १९४८ आणि महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांमध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सत्तावन्नाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :— १९५० चा मध्य प्रांत व वऱ्हाड २. १९६५ चा महा. ४०.

## प्रकरण एक

## प्रारंभिक.

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र महानगरपालिका व नगरपरिषदा (सुधारणा) अधिनियम, २००६ असे म्हणावे ;

(२) तो, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नेमून देईल अशा दिनांकास अंमलात येईल.

## प्रकरण दोन

## मुंबई महानगरपालिका अधिनियम यामध्ये सुधारणा.

सन १८८८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ यामध्ये कलम ५ब समाविष्ट करणे.

**२.** मुंबई महानगरपालिका अधिनियम (या प्रकरणात यापुढे ज्याचा निर्देश " मुंबई महानगरपालिका अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या कलम ५अ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :— १८८८ चा मुंबई ३.

राखीव जागेकरिता निवडणूक लढविणाऱ्या व्यक्तीने जातीचे प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र सादर करणे.

" **५ब.** अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा, यथास्थिति, नागरिकांचा मागासवर्ग यांच्याकरिता राखीव असलेल्या जागेसाठी निवडणूक लढवण्यास इच्छुक असलेल्या प्रत्येक व्यक्तीने नामनिर्देशन पत्राबरोबर, महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० च्या तरतुदींना अनुसरून, सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र व पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असेल. ". २००१ चा महा. २३.

सन १८८८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम १६ ची सुधारणा.

**३.** मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या, कलम १६ मधील पोट-कलमे (१ब) व (१क) वगळण्यात येतील.

## प्रकरण तीन

## मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ यामध्ये सुधारणा.

सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५९ यामध्ये कलम ५ब समाविष्ट करणे.

**४.** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ (या प्रकरणात यापुढे ज्याचा निर्देश " प्रांतिक महानगरपालिका अधिनियम " असा करण्यात आला आहे) १९४९ चा मुंबई ५९.

याच्या कलम ५अ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

राखीव जागेकरिता निवडणूक लढविणाऱ्या व्यक्तीने जातीचे प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र सादर करणे.

" **५ब.** अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा, यथास्थिति, नागरिकांचा मागासवर्ग यांच्याकरिता राखीव असलेल्या जागेसाठी निवडणूक लढवण्यास इच्छुक असलेल्या प्रत्येक व्यक्तीने नामनिर्देशन पत्राबरोबर, महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० च्या तरतुदींना अनुसरून, सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र व पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असेल. ".

२००१ चा महा. २३.

सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५९ याच्या कलम १० ची सुधारणा.

**५.** प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाच्या, कलम १० मधील, पोट-कलमे (१ ब) व (१ क) वगळण्यात येतील.

## प्रकरण चार

## नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ यामध्ये सुधारणा.

१९५० चा मध्य प्रांत व वऱ्हाड २.

सन १९५० चा मध्य प्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक २ यामध्ये कलम ९अअ समाविष्ट करणे.

**६.** नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ (या प्रकरणात यापुढे ज्याचा निर्देश "नागपूर महानगरपालिका अधिनियम" असा करण्यात आला आहे) याच्या कलम ९अ नंतर पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

राखीव जागेकरिता निवडणूक लढविणाऱ्या व्यक्तीने जातीचे प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र सादर करणे.

" **९अअ.** अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा, यथास्थिति, नागरिकांचा मागासवर्ग यांच्याकरिता राखीव असलेल्या जागेसाठी निवडणूक लढवण्यास इच्छुक असलेल्या प्रत्येक व्यक्तीने नामनिर्देशन पत्राबरोबर, महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० च्या तरतुदींना अनुसरून, सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र व पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असेल. ".

२००१ चा महा. २३.

सन १९५० चा मध्य प्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक २ याच्या कलम १५ ची सुधारणा.

**७.** नागपूर महानगरपालिका अधिनियमाच्या, कलम १५ मधील, पोट-कलमे (२) व (३) वगळण्यात येतील.

## प्रकरण पाच

## महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यामध्ये सुधारणा.

१९६५ चा महा. ४०.

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० यामध्ये कलम ९अ समाविष्ट करणे.

**८.** महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (या प्रकरणात यापुढे ज्याचा निर्देश "नगरपरिषदा अधिनियम" असा करण्यात आला

आहे) याच्या कलम ९ नंतर पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

राखीव जागेकरिता निवडणूक लढविणाऱ्या व्यक्तीने जातीचे प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र सादर करणे.

" **९अ.** अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा, यथास्थिति, नागरिकांचा मागासवर्ग यांच्याकरिता राखीव असलेल्या जागेसाठी निवडणूक लढवण्यास इच्छुक असलेल्या प्रत्येक व्यक्तीने नामनिर्देशन पत्राबरोबर, महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० च्या तरतुदींना अनुसरून, सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र व पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असेल. ".

२००१ चा महा. २३.

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम १६ ची सुधारणा.

**९.** नगरपरिषदा अधिनियमाच्या कलम १६ मधील पोट-कलमे (१ब) व (१क) वगळण्यात येतील.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई